
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month




# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५७ वे, अंक ७वा, मुंबई । सप्टेंबर २०२४
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 57, Issue : 7, Mumbai I September 2024
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50







देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५७वे, अंक ७वा,
सप्टेंबर २०२४
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in

## वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ११.०८.२०२४ : क्षणचित्रे















# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

## कार्यकारीणी २०२४ ते २०२७

**अध्यक्ष** : श्री. महेंद्र उर्फ भैया गंधे, अहमदनगर
**कार्याध्यक्ष** : श्री. प्रभाकर कुलकर्णी, विलेपार्ले, मुंबई
**कार्यवाह** : श्री. मिलिंद सरदेशमुख, ठाणे
श्री. आनंद कुलकर्णी, विलेपार्ले, मुंबई
श्री. रोहिणी तडवळकर, सोलापूर
श्री. गणेश वढवेकर, भुसावळ
**कोषाध्यक्ष** : श्री. विनोद मांडके, (सनदी लेखापाल), दादर, मुंबई
**कार्यकारणी सदस्य** : डॉ. हरी महाशब्दे, अकोला
श्री. रामचंद्र दिगवडेकर, मुलुंड, मुंबई
श्री. सुनिल पारखी, पुणे
श्री. विजय चाव्हरे, कल्याण
श्री. विनोद देशमुख, नांदेड
श्री. जगन्नाथ जोशी, डोंबिवली
श्री. नितिन शहापुरकर, वडोदरा
श्री. मधुकर कुलकर्णी, लातूर
श्री. विनायक जोशी, बेळगाव
श्री. दत्ता आराध्ये, सोलापूर
श्री. अनिल पानसे, पुणे
श्री. अनिकेत अष्टेकर, कोल्हापूर
श्री. मंदार तगारे, नाशिक
श्री. अभय जोशी, बेळगाव
श्री. रमेश पाटील, दादर, मुंबई
सौ. केतकी कुलकर्णी, कोथरुड, पुणे
श्री. जयंत देशपांडे, पुणे
श्री. वासुदेव (नाना) जोशी, मंगळवेढा
श्री. आश्विन उपाध्ये, पुणे
श्री. गिरिश कुलकर्णी, गिरगाव, मुंबई
सौ. ज्योती जोशी, विलेपार्ले
ॲड्. श्रीमती मंजिरी पारसनीस, दादर
श्री. गोविंद भाऊराजे जहागिरदार, हैद्राबाद

# संपादकीय

अखिल देशस्थ ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ११.०८.२०२४ रोजी संस्थेच्या लक्ष्मीनारायण बाग सभागृहात मा. श्री. विलास विनायक जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेस एकूण १०३ सभासद उपस्थित होते. सुरुवातीला लक्ष्मीनारायण मुर्तीची पूजा करण्यात आली. उपस्थितांनी सामुहिक श्रीसुक्ताचे पठण केले. त्यानंतर श्रीम. संगीताताई ओनपारकर, वडोदरा यांनी ईशस्तुतीचे गायन केले. समाजातील ज्ञात, अज्ञात दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून संस्थेचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सभेचे प्रास्ताविक केले. श्री. मिलिंद सरदेशमुख यांनी सभेची अग्रसूचना वाचून दाखविली. विषय क्र. १ नुसार ३०.०९.२०२३ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून दुरुस्तीसह मंजूर करण्यात आले. विषय क्र. २ नुसार आर्थिक वर्ष २०२३-२४ या वर्षाचा अहवाल व हिशोब तपासनीसांनी तपासलेली हिशोब पत्रके व ताळेबंद कोषाध्यक्ष श्री. विनोद मांडके यांनी सभेपुढे मांडली. उत्पन्नात गत आर्थिक वर्षापेक्षा १३.६५ टक्क्यांनी तसेच निव्वळ नफा ४४.२१ टक्क्यांनी वाढला असून ठेवू आणि गंगाजळीमध्ये ६.५९ टक्क्यांची वाढ झालेली दिसून येते. उपस्थित सदस्यांनी हिशोब तपासनीस श्री. श्रीनिवास गोगटे सी.ए. व श्री. विनोद मांडके सी.ए. यांचे अभिनंदन केले आणि ठराव सभेने चर्चेअंती एकमताने मंजुर केला. विषय क्र. ३ नुसार सन २०२४-२५ या वर्षाचे अंदाजपत्र यावर साधक-बाधक चर्चा होऊन अंदाजपत्रक एकमताने मंजूर करण्यात आले. कार्यकारी मंडळाने सामुहिक आरोग्य विमा संस्थेच्या सभासदांसाठी राबविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी असा ठराव श्री. अरविंद हस्तेकर यांनी मांडला. तो मंजुर करण्यात आला. आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षासाठी सनदी लेखापाल श्री. श्रीनिवास गोगटे यांची पुनश्च नेमणुक करत असल्याचा ठराव एकमताने मंजुर करण्यात आला. आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षासाठी ॲड. आनंद नायक यांची कायदेशीर सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात यावी असा ठराव एकमताने मंजुर करण्यात आला. तसेच ॲड्. आनंद नायक यांना संस्थेच्यावतीने भाडेकरुंच्या विरोधात प्रलंबित सर्व दाव्यांमध्ये संस्थेची बाजू मांडण्याची संमत्ती देत आहे. तसेच भाडेकरुविरुद्ध प्रलंबित असलेल्या दाव्यांमध्ये विश्वस्तांच्या व्यतिरिक्त संस्थेचे व्यवस्थापक श्री. सुरेंद्र उर्फ श्रीहरी कुलकर्णी यांना संस्था प्रतिनिधी म्हणून साक्ष देण्याची अनुमती देत आहे असा ठराव एकमताने मंजुर करण्यात आला. तसेच कार्यालयाची ईमारत व दोन्ही सभागृहे व त्यामधील दुरुस्ती तसेच उद्‌वाहक बसविण्यासाठी इ. खर्च म्हणून रु. ३० लाखाच्या खर्चास मंजुरी देण्यात असल्याचा ठराव एकमताने मंजुर करण्यात आला. प्रमुख निवडणुक अधिकारी ॲड्. राजेश मुधोळकर यांनी संस्थेच्या त्रैवार्षिक निवडणुकीचा निकाल तत्कालीन अध्यक्ष श्री. विलास जोशी यांच्याकडे सुपुर्त केला. हा निकाल अध्यक्षांच्या सुचनेनुसार सभेपुढे वाचून दाखविला. श्री. महेंद्र उर्फ भैय्या गंधे यांची संस्थेचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.

निवडणूकीची नोटीस व कार्यक्रम, सूचना दि. १८.०६.२०२४ रोजी संस्थेच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली. उमेदवारी अर्ज दि. २५ जून पासून मिळतील असे संस्थेच्या संकेत स्थळावरुन व नोटीस बोर्डावरुन कळविण्यात आले. अर्ज भरण्याची अंतीम तारीख २ जुलै २०२४ पर्यंत होती. निवडणुकीच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक समाचारच्या जून २०२४ च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले होते. दि. २८.०६.२०२४ रोजी २०२४-२०२७ या वर्षासाठी निवडणूक बिनविरोध झाली असल्याचे मुख्य निवडणुक अधिकारी ॲड्. श्री. राजेश मुधोळकर यांनी घोषित केले. निवडणुक निर्णयानुसार नवनिर्वाचीत अध्यक्ष श्री. महेंद्र उर्फ भैय्या गंधे यांनी नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाची सभा दुपारी ३ वाजता संस्थेच्या सभागृहात बोलाविण्यात आली होती. या सभेत श्री. प्रभाकर कुलकर्णी यांची कार्याध्यक्ष पदी तसेच श्री. विनोद मांडके यांची खजिनदार पदी

आणि श्री. मिलिंद सरदेशमुख, श्री. आनंद कुलकर्णी, सौ. रोहिणी तडवळकर, श्री. गणेश वढवेकर यांची कार्यवाह पदी निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. सर्व नवनिर्वाचित सदस्यांना संस्थेच्या उद्दीष्टांसाठी व संस्थेच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन अध्यक्षांनी सभेची सांगता केली.

## नुपेक्षी कदा राम दासाभिमानी (भाग ४)

**स.भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

**महा संकटीं सोडिले देव जेणे। प्रतापें बळें आगळा सर्व गूणें।**
**जयातें स्मरे शैल्यजा शूळपाणी। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।३१।।**

'श्रीमनाचं श्लोक' मधील एक महत्त्वपूर्ण श्लोक आहे. यात श्रीरामाच्या पराक्रमाचे, भक्तांविषयी असलेल्या त्यांच्या अपार प्रेमाचे, आणि त्यांच्या अद्वितीय शक्तींचे वर्णन केले आहे. चला या ओवीतील प्रत्येक भागाचा सखोल विचार करु.

**'महा संकटीं सोडिले देव जेणे'**

या ओवीच्या सुरुवातीला समर्थ रामदासस्वामी श्रीरामाच्या पराक्रमाचे वर्णन करतात. भगवान श्रीराम हे राक्षस रावणाच्या कैदेतून अनेक देवांना मुक्त करणारे आहेत. रावणाने आपल्या शक्तीने आणि तपोबलाने अनेक देवतांना त्रास दिला होता, परंतु श्रीरामांनी त्यांचा संहार करून देवतांना मोठ्या संकटातून सोडवले. या ओळीतील 'महा संकटी' हे शब्द रावणासारख्या बलाढ्य राक्षसाच्या कैदेत अडकलेल्या देवतांच्या अडचणींचे वर्णन करतात. राम हे असे देव आहेत, ज्यांनी आपल्या पराक्रमाने साऱ्या देवतांना त्या संकटातून मुक्त केले.

**'प्रतापें बळें आगळा सर्व गूणें'**

ही ओळ रामाच्या प्रतापाचे आणि शक्तीचे वर्णन करते. राम हे प्रतापी आहेत आणि त्यांचं बळ सर्व गुणांनी वेगळं आहे. रामाचे पराक्रम, त्यांनी नीतिमत्ता, सहनशीलता आणि त्यांचे धैर्य हे सर्व त्यांना इतर सर्वांपेक्षा अधिक उंचावतात. इथे समर्थ रामदासस्वामी रामाच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण उत्कृष्टतेचे वर्णन करतात. त्यांचा बळाचा आणि प्रतापाचा असा प्रचंड परिणाम आहे की ते साऱ्यांपेक्षा आगळे ठरतात.

**'जयातें स्मरे शैलजा शूळपाणी'**

या ओळीत रामाच्या शक्तीला ओळखून स्वतः महादेव (शंकर) आणि पार्वती (शैलजा) यांचाही उल्लेख आहे. 'शैलजा' म्हणजे पार्वती देवी आणि 'शूळपाणी' म्हणजे भगवान शिव. हे दैवी शिवशक्ती स्वरुप देखील श्रीरामाचे स्मरण करतात, त्यांना वंदन करतात. शिव हे स्वतः महादेव असूनही श्रीरामांना वंदन करतात, यामुळे रामाच्या महत्तेचे वर्णन होते. याचा अर्थ रामाची महिमा इतकी अद्वितीय आहे की परमेश्वर शंकर आणि पार्वतीदेखील त्यांचे स्मरण करतात. तसेच श्रीरामही शंकराची पूजा अर्चना करतात. इथे दोन्ही देवता वेगवेगळ्या नसून तत्वरुपाने एकच आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. दोन्ही देवता एकमेकांचा आदर करतात. एकमेकांना जाणतात की ते भिन्न नसून एकच आहेत.

**'नुपेक्षी कदा राम दासाभिमानी'**

या शेवटच्या ओळीत समर्थ रामदासस्वामी हे श्रीरामांच्या भक्तांप्रती असलेल्या अपार प्रेमाचे वर्णन करतात. श्रीराम कधीही आपल्या भक्तांची उपेक्षा करत नाहीत. राम आपल्या भक्तांबद्दल अत्यंत प्रेमळ आणि

अभिमानाने वागतात. 'दासाभिमानी' शब्दाचा अर्थ आहे 'दासांचा अभिमान असणारा.' म्हणजेच, जो भक्त रामाचे निस्सीम प्रेम आणि श्रद्धा ठेवतो, त्याचं रक्षण आणि सन्मान करणे रामाचं कर्तव्य आहे. या श्लोकाचा सारांश असा की भगवान श्रीराम हे महाशक्तिमान, महापराक्रमी आहेत आणि त्यांनी आपल्या भक्तांचं रक्षण केलं आहे. भगवान श्रीराम हे आपल्या भक्तांना कधीही उपेक्षित ठेवत नाहीत.

## आरोग्याचे स्त्री जीवनाचे - मातृत्वातील रक्तस्त्राव

**डॉ. रश्मी फडणवीस** (मो. : ९८२०२८२१३०)

मातृत्व ही स्त्रीला लाभलेली निसर्गदत्त देणगी. या मातृत्वात अडचणी का व कधी येतात असा विचार जर वैज्ञानिकदृष्ट्या केला तर आढळून येईल - जशी अवयव प्रत्यारोपणाची प्रक्रिया गुंतागुंतीची आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक गुंतागुंतीची रासायनिक प्रक्रिया यशस्वीपणे पार पडणे किती महत्त्वाचे ठरते. ती पार पाडण्यास निसर्ग समर्थ असेलच पण काही येणाऱ्या या मानवनिर्मित असतात. यात आईने त्या बाळाला किती सकारात्मक स्विकारावं हे महत्त्वाचं ठरतं.

मासिकपाळीत दर महिन्यास ठराविक कालावधीनंतर चार ते पाच दिवस रक्तस्त्राव होऊन पाळी संपते. काही स्त्रियांच्या बाबतीत हे संतुलन गर्भारपणीही पहिल्या तीन महिन्यात आढळते. यामुळेच काही स्त्रियांना आपल्याला राहिलेल्या गर्भाची जाणीव तज्ञ डॉक्टरने तपासणी केल्याखेरीज समजत नाही. गर्भधारणा राहिल्यानंतर काही वेळेस हे फलित बीज गर्भाशयात येऊन विसावण्याआधी अंडनलिकेतच विसावते. अशावेळी ही गर्भधारणा तीन महिन्यातून अधिक वाढूच शकत नाही, गर्भधारणा राहिल्यानंतरही काही वेळेस रक्तस्त्राव अनियमित होत असेल व पोटात अतिशय दुखत असेल तर योनीमार्गातून केल्या जाणाऱ्या तपासणीसमवेत अल्ट्रासोनोग्राफीतून हे ज्ञान अधिक स्पष्टरित्या मिळते व त्यानुसार औषधोपचार करून त्या मातेचा जीव वाचू शकतो.

दोन-तीन महिन्यांची गर्भधारणा राहिल्यानंतर पुन्हा रक्तस्त्राव सुरु होणे हे काळजीचेच. सोनोग्राफीत काही वेळेस गर्भाबरोबर एखादी रक्ताची गुळळीसुद्धा (हेमेटोमा) दिसते. तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार इलाज होण्यास हवा. ही गाठ वाढल्यास काही अंशी गर्भास इजा पोहचू शकते. काही वेळा रक्तस्त्रावाचा रंग हा वीटकरी होतो. अशा वेळेस गर्भ नीट वाढत नसल्याचे हे निदान असू शकते. ही गर्भधारणा (मिस्ड ऍबॉर्शन) गर्भपाताकडे झुकू लागते. अशा वेळेस तज्ञ डॉक्टर योग्य तो सल्ला देणारच. काही स्त्रियांच्या बाबतीत गर्भधारणा जेवढ्या महिन्यांची हवी त्यापेक्षा अधिक दिसू लागते. अल्ट्रासोनोग्राफीच्या सहाय्याने अशावेळी गर्भधारणा राहिली तरी गर्भधारणेच्या बरोबर द्राक्षासारख्या घडांची वाढ दिसून येते अर्थातच अशावेळेस रक्तस्त्रावही होतो. या स्थितीला 'व्हेसिक्युलर मोल' असं संबोधिले जाते. यावर त्वरीत इलाज करावा लागतो नाहीतर अतिरक्तस्त्रावाने जीवास धोका पोहोचू शकतो.

काही वेळेस बाळाच्या वाढीत व्यंग दिसून आल्यास वा तशी संभावना असल्यास गर्भाच्या जीवास धोका पोहोचणार नाही अशी काळजी घेऊन अल्ट्रासोनोग्राफीच्या सहाय्याने पेशींचा तुकडा घेऊन जनुकांच्या अभ्यासास पाठविला जातो (कोरिऑनिक व्हीलस् सँपलिंग) असं नांव असलेला तपास करणं भाग पडतं. तसंच बाळाच्या पोषणाच्या, त्याच्याभोवती असलेल्या आवरणातून पाणी काढून ते तपासणीत (अम्नीओसेन्टेसिस) पाठविले जाते. अशावेळेस रक्तस्त्राव होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रक्तगट निगेटीव्ह असल्यास बाळाची वाढ होता होता कधीतरी अचानक रक्तस्त्राव होऊ शकतो. अशावेळी अत्याधुनिक उपचार शास्त्राप्रमाणे बाळाची व आईची काळजी घेणे आवश्यक आहे.

हे झाले प्रसूतीपूर्व गर्भधारणा दोन-तीन महिन्यांच्या कालावधीतील अडचणी व उपचार. त्यानंतरच्या कालातील रक्तस्त्राव हा नाळेच्या स्थिरावणाच्या स्थितीवर अवलंबून असतो. जर नाळेचा बहुतांश भाग गर्भाशयाच्या मुखाच्या अगदी वर असेल तर रक्तस्त्राव होत नाही परंतु नाळेचा काही भाग हा गर्भाशयाच्या मुखावर आच्छादित करत असेल तर स्त्रीस गर्भारपणी उठता बसता रक्तस्त्राव होऊ शकतो. यासाठी संपूर्ण विश्रांती व डॉक्टरी संवाद आवश्यक आहे.

हे झाले प्रसूतीपुर्व गर्भधारणा दोन-तीन महिन्यांच्या कालावधीतील अडचणी व उपचार. त्यानंतरच्या कालातील रक्तस्त्राव हा नाळेच्या स्थिरावण्याच्या स्थितीवर अवलंबून असतो. जर नाळेचा बहुतांश भाग हा गर्भाशयाच्या मुखाच्या अगदी वर असेल तर रक्तस्त्राव होत नाही परंतु नाळेचा काही भाग हा गर्भाशयाच्या मुखावर आच्छादित करत असेल तर स्त्रीस गर्भारपणी उठता बसता रक्तस्त्राव होऊ शकतो. यासाठी संपूर्ण विश्रांती व डॉक्टरी संवाद आवश्यक आहे. यात अनेक प्रकार आहेत. काही वेळेस सातव्या महिन्यातच रक्तस्त्राव सुरु झाला तर मूल व माता या दोघांच्या जीवास हानी पोहोचू शकते. अशावेळेस सिझेरिअनचा पर्याय निवडावा लागतो.

काही वेळेस नैसर्गिक प्रसूती होवो वा (सिझेरिअन) अनैसर्गिकरित्या प्रसूती होवो - रक्तस्त्राव नेहमीपेक्षा अधिक होतो. अशावेळेस नाळेचा काही भाग गर्भाशयाच्या आवरणात असल्यामुळे हा रक्तस्त्राव थांबविता येत नाही. अशावेळेस करावयाची उपाययोजना त्वरीत करावी लागते. तसेच काहीवेळेस प्रसूतीपुर्व नाळेचा काही भाग गर्भाशयाच्या आवरणापासून सुटा होतो यामुळे होणारा रक्तस्त्राव थांबविण्यास प्रसूती लवकर करणे भाग पडते. जसं नाळेच्या स्थितीवर व गर्भाशयाच्या किती आवरणापर्यंत ती व्यापिली आहे हे महत्त्वाचे तसेच नाळेतून बाळाचे होणारे पोषणही लक्षात घेण्यास हवे.

रक्तस्त्राव हा गर्भारपणीच होतो असे नाही तर प्रसूती झाल्यानंतरही काही काल साधारण ४० दिवस चालूच रहातो. परंतु प्रसूती झाल्यानंतर लगेचच अति रक्तस्त्राव होत असेल तर त्याची कारणे अनेक व वेगळी असू शकतात. तज्ञ डॉक्टर ती रुग्णांना सांगतातच तरीही प्रसूती झाल्यानंतरचा रक्तस्त्राव दुर्लक्षित करता कामा नये. ज्यांना एकापेक्षा अनेक गर्भ असतील त्यांनी विशेष करून लक्ष द्यावे. तसेच प्रसूतीनंतर नाळ पूर्णपणे शरीराबाहेर टाकण्याची क्रियाही २० ते ३० मिनिटांत होण्यास हवी, तसे न झाल्यास भूल देऊन नाळ तिच्या आवरणांसहीत बाहेर काढली जाते. ही परिस्थिती ही काळी वेळेस उद्भवते.

तसेच काही स्त्रियांना लोहघटकाचे कमी प्रमाण, आधीच असलेला जंतुसंसर्ग, रक्तघटकांची कमतरता यामुळे होणारा रक्तस्त्राव हा अतिशय भरपूर प्रमाणाता होतो व त्यावर नियंत्रण ठेवणे कठीण जातं. या स्थितीला डी.आय.सी. (डिसेमिनेटेड इंट्राव्हॅस्क्युलर कोएगुलेपॅथी) म्हणतात. यात होणारी जीवित हानी टाळणे असंभव ठरते. म्हणूनच वेळीच उपाययोजना अवलंबिणे आवश्यक ठरते. मातृत्वातील संपूर्ण कालावधीत स्त्रीने आरोग्य संतुलीत ठेवणे जरुरीचे आहे तसेच लक्षणांप्रमाणे त्वरीत उपाययोजना केल्यास संभाव्य धोके टाळता येतील.

वाटेल की प्रसूती म्हणजे स्त्रीचा दुसरा जन्मच. सर्व काही सुरळीत होत असेल तर प्रश्नच नसतो परंतु प्रसूतीच्या प्रत्येक टप्प्यांवर सतर्क राहून त्याप्रमाणेच उपाययोजना योग्य मार्गाने झाल्यास अशा वेगवेगळ्या पध्दतीने, कारणांनी होणारा रक्तस्त्राव आटोक्यात आणून चांगल्या फलिताचा विचार करु शकतो.

**सर्व सभासद, हितचिंतक, देणगीदार यांना श्रीगणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!**

# माझ्या मराठीचा बोलू कौतुके

**सौ. वृषाली मधुसूदन भिडे** (मो. : ९८२११२५७८७७)

**'माझा मराठीचा बोलू कौतुके, अमृतातेही पैजा जिंके'**

षोडशवर्षीय ज्ञानेश्वरांनी 'मराठी' भाषेबद्दल ज्ञानेश्वरीमध्ये उद्धृत केलेले हे बोल आजही जगभर या भाषेचे कौतुक सोहळे साजरे करत आहेत. या मराठी भाषेची तुलना अमृताशी करून पैजही जिंकण्याचे सामर्थ्य या भाषेत आहे. अ-मृत म्हणजे मृत न होणारी अर्थात अमरत्व धारण केलेली भाषा म्हणजे मराठी. अमृतमय संजीवनी प्राप्त झालेली मराठीभाषा इतर सर्व भाषांवर वर्चस्व प्रस्थापित करते. 'मरहट्टील, 'मऱ्हाटील, 'मराठी' अशा व्युत्पत्तीची मराठीभाषा अनादिकाळापासून जनमानसात रुढ आहे. 'मी मराठी' असे मराठी अभिमानाने सांगताना व करोडो माणसे ते ऐकताना रोमांचित होतात काय आहे या भाषेत? याहीपेक्षा काय नाही या भाषेत! याचाच प्रत्यय येतो. विपुल शब्दसंपदेने नटलेल्या मराठी भाषेचा मोह सर्वच दिग्गज लेखक-लेखिका, कवी-कवयित्री यांना पडला व अजूनही पडतो आहे. त्यांच्या लेखणीतून उतरलेली सामाजिक, राजकीय, पौराणिक, धार्मिक, शैक्षणिक, शास्त्रीय, करमणूकप्रधान अशा विविध विषयांवरील असंख्य पुस्तके मराठीतूनच प्रकाशित झाली व त्यांनी देश-विदेशात वाचकवर्ग तयार केला. विदेशात तर अनेक ठिकाणी मराठी वाङ्मय मंडळे आहेत. तेथे होणाऱ्या व्याख्यानांना, ग्रंथ प्रदर्शनांना, नाटकांना तसेच स्पर्धात्मक कार्यक्रमांना चाहते गर्दी करतात. गोष्टी, कथा, नियतकालिके, वृत्तपत्रे, कादंबऱ्या, नाटके, चरित्रे, समीक्षा यासारखे भारदस्त गद्य वाङ्मय मराठी भाषेची थोरवी सांगते. आजही मराठी दर्जेदार नाटकांचे हजारोंच्या घरात सादर होणारे प्रयोग


**JV MARKETING & INVESTMENTS**

*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande* — *+91 98330 25031*
*MBA - Marketing* — *jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785* — *@jvmarketing18* — *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 9833025031**

व मराठी नाट्यगृहाबाहेरील हाऊसफुलची पाटी मराठी रसिकांच्या प्रेमाचेच प्रतीक दर्शविते. याबरोबरच मराठी चित्रपटाने जेव्हा ऑस्कर पर्यंत मजल मारुन मराठी भाषेची ताकद दाखवून दिली तेव्हा सर्वांच्या नजरा मराठीकडे वळल्या. हिंदी चित्रपटातील नामवंत कलाकार मराठी चित्रपटांचे यशस्वी निर्माते झाले. दूरदर्शनवरील 'चला हवा येऊ द्या' या कथाबाह्य कार्यक्रमाने भारतातच नव्हे तर परदेशातही सर्वोच्च लोकप्रियता मिळवली. आजही हा कार्यक्रम प्रथम स्थानावर आहे व राहील यात शंका नाही. या कार्यक्रमात सहभागी होऊन इतर भाषांमधील अनेक मातब्बर कलाकार स्वतःला धन्य मानतात. मराठी भाषेतील पद्यवाङ्मयावर महाराष्ट्रातील सर्व मराठी भाषिक निःस्सीम प्रेम करतात. प्रातःकाळची 'घनःश्याम सुंदरा' ही भूपाळी अवघ्या महाराष्ट्राला जागे करते. ज्ञानेश्वरीतील ओव्या व पसायदान ऐकताना मनःसाधनेबरोबरच वैश्विक एकात्मतेची भावना जागृत होते. 'राधा गौळण करिते मंथन' सारखी अनेक भावगीते आत्म्याचे परमात्म्याशी नाते जोडतात. 'चाफा बोलेनाल, 'मधु मागशी माझ्या सख्यापरी' यासारखी द्वयर्थी भावगीते मन अंतर्मुख करतात तर 'केशवा माधवाल, 'दत्त दिगंबर दैवत माझे' यासारखी भक्तिगीते भक्तांना डोलायला लावतात. तर 'माऊली' या एकाच मराठी शब्दात मनःचक्षुंपुढे प्रत्यक्ष परमेश्वराची मूर्ती साकारण्याची किमया आहे. मराठीला 'माय मराठी' म्हणतात. खरोखरच मातेप्रमाणे मायाळू, प्रेमळ, मनासा ठाव घेणारी मराठी सहजपणे समजणारी, समजावणारी, श्रवणीय, वाचनीय व मननीय मराठी. चारोळ्या, कविता, गाणी, पोवाडे, अभंग, लावणी, नाट्यसंगीत, शास्त्रीय संगीत, चित्रपट संगीत अशा विविध आभूषणांनी मराठी भाषा सजलेली आहे. 'गीत रामायण' ही अजरामर व अलौकिक काव्यकृती म्हणजे मराठी भाषेचे अस्सल खणखणीत नाणेच आहे जे शब्दातील व कालातीत आहे. 'मराठी बाणा' ह्या मराठमोळ्या कार्यक्रमाने रसिकमनावर अधिराज्य गाजवले आहे. ह्या मराठी भाषेचे सौंदर्य तिच्या प्रांतिक उच्चारणावरुनही लक्षात येते. आधुनिक काळातील दृक-श्राव्य माध्यमातील विविध मालिकांमधून सर्व मराठी रसिक याचा आनंद घेतात. मालिकांमधील मनोरंजनाबरोबर शैक्षणिक क्षेत्रात मराठी भाषेचे महत्व वाढण्यासाठी प्रत्येक शाळेत 'मराठी' विषय सक्तीचा केला पाहिजे. इमारती, उपहारगृहे यांची नावे मराठीतूनच लिहीण्याचा आग्रह धरला पाहिजे. सरकारी कार्यालय, न्यायालयीन कामकाज मराठीतूनच व्हायला हवे. वाढदिवशी भेटवस्तू म्हणून मराठी पुस्तक देण्याची सवय आपणच लावायला हवी. भावी पिढी संस्कारक्षम होण्यासाठी 'झाल्या बहु, होतीतली बहु पण यासम हीच-मराठी.ल

## संलग्न संस्था वृत्त

**कल्याण** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण शाखेने श्रावणमासा निमित्ताने आपल्या सभासद, हितचिंतक,नागरिक यांच्यासाठी खालील भरगच्च कार्यक्रम आयोजित केले होते. सकल ब्राह्मण एकीकरण, सबलीकरण या माध्यमातून कल्याण ब्राह्मण सभा, देशस्थ ब्राह्मण संघ, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ या तिन संस्थांच्या मार्गदर्शनाखाली सामुहिक श्रावणी कार्यक्रम शुक्रवार, दि. ०९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ०७.०० ते १०.०० यावेळेत ब्राह्णण सभा सभागृह कल्याण येथे आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमात ५५ च्या वर सकल ब्रह्मवृंदानी उपस्थिती लावली, या श्रावणीचे पौरोहित्य श्री. गोडसे गुरुजी संपूर्ण माहिति सांगत केले, हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी तिन्ही संस्था पदाधिकारी व कार्यकारणी सदस्यांनी मदत केली. अल्पोपहार व चहापानानंतर या कार्यक्रमाची सांगता झाली.

* देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण शाखेच्या वतीने दि. २० ऑगस्ट, मंगळवार, श्रावण मास, कृष्ण प्रतिपदा या दिवशी कल्याणमधील पुरातन श्री महालक्ष्मी मंदिरात सर्व महिला सभासद, नागरिकांसाठी सामुहिक

कुंकमार्चन सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत छान आयोजित करण्यात आले, कार्यक्रम वेळेवर सुरु झाला. गणपती पुजन, सरस्वती वंदना, श्रीसुक्त पठण १६ वेळा, आरती, मंत्र पुष्पांजली होऊन प्रसाद वाटप, चहापान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. यासाठी महिला कार्यकारणी पदाधिकारी सौ. शुभांगी कुलकर्णी व सदस्यांनी बहुमोल सहकार्य केले. सौ. सरिता सु. कुळकर्णी यांनी महालक्ष्मीची आरती केली.

✲ इकोफ्रेंडली (पर्यावरण पुरक) श्री गणपती बाप्पा मुर्ती कार्यशाळा : शनिवारी, दि. २४ ऑगस्ट २०२४ रोजी कल्याणमधील या कार्यक्रमास १७ लहान थोर सभासद, हितचिंतक यांनी या कार्यशाळेत सहभागी झाले होते. यासाठी सायंकाळी ०३.०० ते ०७.०० या वेळेत या कार्यशाळेचे आयोजन केले होते. आपले सभासद श्री. शेखर संत व त्यांच्या सुकन्या रोहिणी संत यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सौ. माधुरी आमटे व कळवा येथुन श्रीमती पिंगटे या जेष्ठ व श्रेष्ठ सदस्यांनी सहभाग घेतला तसेच परिसरातील अनेक लहान मुलां मुलींनी सहभाग घेतला होता. यास कार्यकारणी सदस्यांचे सहकार्य लाभले. चहापान व लहानांना कॅडबरी देऊन कार्यशाळेची सांगता झाली.

**संभाजीनगर** : दि. १४.०८.२०२४ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळातर्फे श्रावणी उपक्रम मोठ्या उत्साहात पार पाडला. ३० ब्रह्मवृंद आणि ६ बटू ही या उपक्रमात सहभागी झाले होते. श्री. मंदार कुलकर्णी गुरुजींनी श्रावणीचे सर्व विधी आणि महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले. डॉ. श्री. अमोल पांडव यांनी गुरुजीच्या दक्षिणेची जबाबदारी उचलली. मंडळाचे अध्यक्ष श्री. नरेश जोशी यांनी ब्रह्मवृंदासाठी फराळाची जबाबदारी घेतली होती. या उपक्रमासाठी गोपाळ कुलकर्णी, मिलिंद दाभाडकर, अंबादास कुलकर्णी, प्रसाद दाभाडकर, महिला मंडळाच्या मोनिकाताई चौधरी, सीमाताई कस्तुरे, मयुरी दाभाडकर, कल्पना जोशी, रुपाली कुलकर्णी, समृद्धी दाभाडकर, साक्षी दाभाडकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

✲ दि. १५.०८.२०२४ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजमंडळ संभाजीनगर मंडळाचा ९ वा रक्तदान




Protect Capital & Create Wealth.....

**JAYANT DESHMUKH**

B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

LIC

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

STAR Health Insurance

शिबिर उपक्रम उत्साहात पार पाडला. एफ.डी.सी. लि. कंपनीचे ए.जी.एम. श्री. जिवन टिकेकर यांनी रक्तदान करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. त्यांच्यासोबत स्टोअर विभागाचे सिनिअर मॅनेजर श्री. नंदकुमार चोबे, क्यु.सी. विभागाचे सिनिअर मॅनेजर गोपाळ कुलकर्णी यांनीपण रक्तदान केले. या रक्तदान शिबिरात एकूण ४८ रक्तदात्यांनी आपला सहभाग नोंदविला. दरवर्षीप्रमाणे दत्ताजी भाले रक्तपेढीच्या मेडिकल डायरेक्टर डॉ. सौ. मंजुषा कुलकर्णी यांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले. दत्ताजी भाले रक्तपेढीचे सर्व कर्मचारी बंधु-भगिनी आणि प्रशांत चिटणीस साहेबानी बहुमोल मदत केली. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळाचे कार्यकारणी सदस्य व महिला सदस्य यांनी आपला सहभाग नोंदविला. कार्यक्रमास मंडळाचे अध्यक्ष श्री. नरेश जोशी, उपाध्यक्ष रवि जेहुरकर, सहसचिव डॉ. अमोल पांडव, कोषाध्यक्ष श्री. अंबादास जिंतुरकर, कार्यकारणी सदस्य श्री. वैभव देशपांडे, नरेश पटवर्धन, मिलिंद दाभाडकर, पद्माकर कोटचिरकर, गोपाळ कुलकर्णी, महिला अध्यक्ष श्रीम. मोनिकाताई चौधरी, महिला कार्यकारणी सदस्या मयुरी दाभाडकर, कल्पनाताई जोशी, उत्कर्षाताई पारनेरकर, योगिनीताई देशमुख, संपदा वाढोणकर, रुपाली कुलकर्णी, समृद्धी चौधरी, साक्षी दाभाडकर, स्वरा कुलकर्णी हे सर्वजण उपस्थित होते.

**मध्यवर्ती मंडळ** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेत ७८ वा स्वातंत्र्य दिनाचा सोहळा दि. १५.०८.२०२४ रोजी लक्ष्मीनारायण सभागृहाच्या भव्य प्रांगणात पार पडला. संस्थेचे जेष्ठ सभासद श्री. रविंद्र आवटी व संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे कार्यवाह श्री. मिलिंद सरदेशमुख, श्री. आनंद कुलकर्णी आणि कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी स्वातंत्र्य दिनाच्या उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

* अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी लक्ष्मीनारायण सभागृहात विनामूल्य वैद्यकीय तपासणी व सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात उंची, वजन, BMI, SPO2, रक्तदाब, HABIC, Liquid Profile, ECG, हृदय रोग तज्ञांचा सल्ला अशा प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्या. यासाठी डॉ. रश्मी फडणवीस, डॉ. नीता अथणीकर यांनी सहकार्य केले. या शिबिरात सुमारे ७५ नागरिकांनी सहभाग नोंदविला. श्री. आनंद कुलकर्णी, श्री. मिलिंद सरदेशमुख, श्री. विनोद मांडके, श्री. रामचंद्र दिगवडेकर, श्री. गिरीष कुलकर्णी पदाधिकारी उपस्थित होते. कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

* दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजता संस्थेच्या लक्ष्मीनारायण सभागृहात दादर सांस्कृतिक मंच आणि अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या संयुक्त विद्यमाने मास्टर माईंड या नाटकाच्या निर्मितीचा थरार, कलाकारांचा अनुभव आणि बॅकस्टेजच्या गमती जमती अशा स्वरुपात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अभिनेता आस्वाद काळे, अभिनेत्री अदिती सारंगधर, दिग्दर्शक विजय केंकरे, शितल तळपदे, लेखक सुरेश जयराम, निर्माता अजय विचारे, नेपथ्यकार प्रदीप मुळये हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तरा मोने यांनी केले. या कार्यक्रमात संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रकाश कुलकर्णी, श्री. विजय चाव्हरे, श्री. रामचंद्र दिगवडेकर, श्री. रमेश पाटील उपस्थित होते.

**पुणे** : दि. २८.०८.२०२४ रोजी श्री कसबा गणपती सार्वजनीक गणेशोत्सव मंडळ आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था यांच्यातर्फे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात २४० रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. यात ढोल, ताशा पथकांमधील युवक-युवतींचा सहभाग होता. या प्रसंगी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचे अध्यक्ष श्री. राजेंद्र कुलकर्णी, कार्याध्यक्ष जयंत देशपांडे, मुख्य चिटणीस श्री. सुनिल पारखी, सहचिटणीस श्री. अनिल पानसे, श्री कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, कार्याध्यक्ष श्री.

निलेश वकील, कार्यवाह दीपा तावरे आणि विश्वस्त, पदाधिकारी उपस्थित होते. पोलिस उपायुक्त एस. एस. गिल यांनी शिबिराला भेट दिली. ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था शताब्दी वर्ष साजरे करीत आहे.

**विलेपार्ले :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, विलेपार्ले संस्थेतर्फे दिनांक १७.०८.२०२४ रोजी गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत २० ते ५० आणि ५० व त्यापुढील अशा वयोगटातील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. श्री. संजय अंकलीकर आणि दिपाली कामत अगरवाल या दोघांनी परीक्षकांची भूमिका पार पाडली. स्पर्धा खूपच रंगत झाली.

## वधू पाहिजे

*** वेदप्रकाश उर्फ विनित सदाशिव पानसे :** जन्म तारीख : २३.०६.१९७९, वेळ : सायंकाळी ५.१०, जन्म ठिकाण : सातारा, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, शिक्षण : बी.कॉम, जी.डी.सी. ॲण्ड् ए., कॉम्प्युटर डिप्लोमा, उंची : ५.८, रक्तगट : AB+, वर्ण : गोरा, नोकरी : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग अंतर्गत, मराराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गात सहाय्यक लेखाधिकारी (वर्ग २) (राजपत्रित) पदावर, नोकरीत कायम, मासिक वेतन : रु. ९०,०००/-, गोत्र : मुद्‌गल, रास : वृषभ, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : सदाशिव हरी पानसे, संपर्कासाठी दूरध्वनी : ९३२६७२६६४८, ९५४५५१७१४९, अपेक्षा : सुसंस्कृत, अनुरुप, पदवीप्राप्त, संगणक ज्ञान, नोकरी करण्याची तयारी.

*** ऋषिकेश पर्शाराम जोशी :** कल्याण जन्म तारीख : १५ सप्टेंबर १९९३, जन्म वेळ : संध्याकाळी ०६.१५, उंची : ५.११, सुदृढ बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : शांडिल्य, रास : सिंह, नक्षत्र : पुर्वा, नाडी : मध्य, गण : मनुष्य, शिक्षण : १२ वी उच्च माध्यमिक परिक्षा पास, नोकरी : मध्य रेल्वे, कुर्ला, उत्पन्न : प्रतिमाह रु. २५,०००/- अपेक्षा : मनमिळावू, एकत्र कुटुंब पद्धतीत राहणारी, संपर्क क्रमांक : ८४५४९००९८२.

*** वरुण विकास कापडी :** कल्याण, (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : ०२ नोव्हेंबर १९९३, उंची : ५.००, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : मुलुंड, मुंबई, गोत्र : शांडिल्य, रास : वृषभ, नक्षत्र : रोहिणी, चरण : चतुर्थ, नाडी : अंत्य, गण : मनुष्य, शिक्षण : बी. ई. कॉम्प्युटर इंजिनिअर, नोकरी : खाजगी, उत्पन्न : वार्षिक रु. १५ लाख, अपेक्षा : मनमिळावू, पदवीधर, अनुरुप, संपर्क क्रमांक : ८१०८५५५७११ / ९८१९६८८४७८.

*** ऋषिकेश विनोद महाजन :** डोंबिवली (देशस्थ यजुर्वेदी), जन्म तारीख : ०६ नोव्हेंबर १९९३, जन्म वेळ : संध्याकाळी ०७.०५, उंची : ५.११, सडपातळ बांधा, चष्मा आहे. जन्म ठिकाण : डोंबिवली, गोत्र : अगस्ती, रास : कर्क, नक्षत्र : पुष्य, चरण : तृतीय, नाडी : मध्य, गण : देव, शिक्षण : पदवीधर, आय.टी. इंजिनिअर, नोकरी : खासगी कंपनी, हैद्राबाद, उत्पन्न : वार्षिक रु. १५ लाख, अपेक्षा : मनमिळावू, पदवीधर, अनुरुप, सध्या मुलाचे वास्तव्य हैद्राबाद त्यामुळे तेथे राहण्याची तयारी हवी, संपर्क क्रमांक : ९८२०८०५१०७ / ७७७४८९५७०६.

*** तन्मय श्रीकांत जोशी :** बदलापूर (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : १९ ऑगस्ट १९९६, जन्म वेळ : सकाळी ०९.५८, उंची : ५.५, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : बदलापूर, गोत्र : शांडिल्य, रास : कन्या, नक्षत्र : चित्रा, नाडी : मध्य, गण : देव, शिक्षण : एच. एस. सी. वाणिज्य, आय. टी. आय. सिव्हिल ड्राफ्ट्समन, नोकरी : वाशी नवी मुंबई, उत्पन्न : वार्षिक रु. ३.६ लाख, अपेक्षा : मनमिळावू, पदवीधर, अनुरुप, नोकरी करणारी हवी, संपर्क क्रमांक : ७६२००४३२९४.

**※ ओंकार उदय देशपांडे :** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : १२ ऑक्टोबर १९९३, जन्म वेळ : सकाळी ०३.१०, उंची : ५.८, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : बेळगांव, गोत्र : काश्यप, रास : सिंह, नक्षत्र : मघा, चरण : द्वितीय, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : बी.एस.सी. इंन्स्टुमेंटेशन, नोकरी : खाजगी, उत्पन्न : वार्षिक रु. ०६ लाख, अपेक्षा : मनमिळावू, पदवीधर, नोकरी करणारी, संपर्क क्रमांक : ८६५७२९८९९३ / ७८७५८९२३७३.

**※ आभिष प्रशांत ठोसर :** (चित्पावन), वास्तव्य : दिवे आगार श्रीवर्धन, जन्म तारीख : ०१ जुन २०००, जन्म वेळ : सायंकाळी ०७.२९, उंची : ५.५, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : बोर्लीपंचतन, श्रीवर्धन, गोत्र : भारद्वाज, रास : मेष, चरण : द्वितीय, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : १० वी शालांत परीक्षा उत्तीर्ण, L.S.S. Veterinary Doctor, नोकरी : खाजगी पशुवैद्य, उत्पन्न : वार्षिक रु. ०६ ते ०८ लाख, अपेक्षा : मनमिळावू, पदवीधर, गावात राहणारी, संपर्क क्रमांक : ८०८७४१४३६७ / ७७७००७८४१३ / ९६५३४१५५०३

**※ अभिजित दिलिप वणकर :** (चित्पावन), वास्तव्य : दापोली, रत्नागिरी, जन्म तारीख : २२ ऑक्टोबर २०००, जन्म वेळ : रात्री ०९.४५, उंची : ५.००, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : टेटवली, दापोली, रत्नागिरी, गोत्र : काश्यप, रास : सिंह, नक्षत्र : मघा, चरण : द्वितीय, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : १२वी, नोकरी / व्यवसाय : शेती, गाडी भाड्याने देणे, उत्पन्न : वार्षिक रु. २ ते ३ लाख, अपेक्षा : मनमिळावू, समकक्ष, गावात राहणारी, घर सांभाळणारी, संपर्क क्रमांक : ९६९९८२५६०२.

### घटस्फोटित

**※ अक्षय विजय फाटक :** (चित्पावन), वास्तव्य : वापी, गुजरात, जन्म तारीख : १६ मे १९९१, जन्म वेळ : पहाटे १.२५, उंची : ५.७, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : कौशिक, रास : वृषभ, नक्षत्र : मृग, चरण : प्रथम, नाडी : मध्य, गण : देव, शिक्षण : बी.ई. मेकॅनिकल, नोकरी / व्यवसाय : खासगी व्यवसाय, उत्पन्न : वार्षिक रु. १२ ते १८ लाख, अपेक्षा : मनमिळावू, पदवीधर, समंजस, विनापत्य, संपर्क क्रमांक : ९१०६६१००९१.

**※ गौरव सुधाकर घाणेकर :** (चित्पावन) वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : ०७ ऑगस्ट १९९०, जन्म वेळ : दुपारी ०२.५५, उंची : ५.५, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : सायन, मुंबई, गोत्र : गार्ग्य, रास : कुंभ, नक्षत्र : धनिष्ठा, चरण : तृतीय, नाडी : मध्य, गण : राक्षस, शिक्षण : सनदी लेखापाल (सी.ए.), नोकरी / व्यवसाय : सनदी लेखापाल, उत्पन्न : वार्षिक रु. १० ते १२ लाख, अपेक्षा : मनमिळावू, उच्च शिक्षित, सांभाळून घेणारी, संपर्क क्रमांक : ८१६९०६४७०७.

## वर पाहिजे

**※ स्नेहा राजेंद्र भावे :** (चित्पावन) वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : ०२ नोव्हेंबर १९९१, जन्म वेळ : दुपारी १२.५४, उंची : ५.३, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : नाशिक, गोत्र : भार्गव, रास : सिंह, नक्षत्र : पुर्व फाल्गुनी, चरण : तृतीय, नाडी : मध्य, गण : मनुष्य, शिक्षण : एम. ए. इतिहास, नोकरी / व्यवसाय : खाजगी क्लासेस मध्ये, उत्पन्न : वार्षिक रु. १ लाख, अपेक्षा : मनमिळावू, उच्च शिक्षित, सांभाळून घेणारा, मुलीला अनुरुप, संपर्क क्रमांक : ९७६९६९९२२१.

**∗ सायली प्रमोद विसाळ :** (देशस्थ यजुर्वेदी), वास्तव्य : अंबरनाथ, जन्म तारीख : २३ नोव्हेंबर १९९१, जन्म वेळ : सकाळी ०८.०२, उंची : ५.२, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : अंबरनाथ, ठाणे, गोत्र : कात्यायन, रास : कर्क, नक्षत्र : पुनर्वसु, चरण : चतुर्थ, नाडी : आद्य, गण : देव, शिक्षण : बी.एम.एस. मॅनेजमेंट, नोकरी / व्यवसाय : नोकरी शोधात, उत्पन्न : नाही, अपेक्षा : शाकाहारी, सांभाळून घेणारा, मुलीला अनुरुप, स्वतःच्या पायावर उभा असणारा, संपर्क क्रमांक : ९०४९८८९८४३ / ८८०६६२२०१३.

**∗ अमृता अजित देव :** (देशस्थ ऋग्वेदी), वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : ०३ जुन १९९२, जन्म वेळ : रात्री १०.२९, उंची : ५.२, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : अनगांव, भिवंडी, जिल्हा ठाणे, गोत्र : वसिष्ठ, रास : मिथुन, नक्षत्र : आर्द्रा, चरण : द्वितीय, नाडी : आद्य, गण : मनुष्य, शिक्षण : बी.एम.सी. कॉम्प्युटर सायन्स, नोकरी / व्यवसाय : खाजगी, ऐरोली, उत्पन्न : वार्षिक ४.८ लाख, अपेक्षा : शाकाहारी, सांभाळून घेणारा, मुलीला अनुरुप, निर्व्यसनी, संपर्क क्रमांक : ९८१९४३५६२८ / ८०९७१०९६६३.

**∗ प्रतिक्षा लक्ष्मण दिक्षीत :** (देशस्थ शुक्ल यजुर्वेदी), वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : ०२ जुन १९९२, जन्म वेळ : रात्री १२.२७, उंची : ५.१, सडपातळ बांधा, जन्म ठिकाण : नाशिक, गोत्र : कृष्णात्रेय, रास : वृषभ, नक्षत्र : मृग, नाडी : मध्य, गण : देव, शिक्षण : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, डिप्लोमा कॉम्प्युटर सिव्हिल आर्किटेक्चर, नोकरी / व्यवसाय : खाजगी, उत्पन्न : वार्षिक ४.८ लाख, अपेक्षा : उच्च शिक्षित, शाकाहारी, सांभाळून घेणारा, मुलीला अनुरुप, निर्व्यसनी, संपर्क क्रमांक : ९२२१५८५०३२ / ८२८६२५५४०६.

**∗ राजश्री शरदचंद्र वाडेकर :** (देशस्थ शुक्ल यजुर्वेदी), वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : १० मे १९९२, जन्म वेळ : सकाळी ०६.५०, उंची : ५.७, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : काश्यप, रास : सिंह, नक्षत्र : मघा, चरण : फ्रथम, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : एम.कॉम, नोकरी / व्यवसाय : कंपनी सेक्रेटरी शिकत आहे., उत्पन्न : नाही, अपेक्षा : अनुरुप, स्वतःचे घर असावे, नोकरी असावी, शाकाहारी, निर्व्यसनी, संपर्क क्रमांक : ९३२०६७६८६३.

**∗ सायली प्रविण जोशी :** (देशस्थ शुक्ल यजुर्वेदी), वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : १२ ऑगस्ट १९९२, जन्म वेळ : सकाळी ११.००, उंची : ५.३, सडपातळ बांधा, जन्म ठिकाण : पंढरपूर, गोत्र : गौतम, रास : मकर, नक्षत्र : श्रवण, चरण : फ्रथम, नाडी : अंत्य, गण : देव, शिक्षण : बी.कॉम, नोकरी / व्यवसाय : खाजगी, उत्पन्न : मासिक रु. २० हजार, अपेक्षा : नोकरी करणारा, उच्च शिक्षित, स्वतःचे घर असावे, संपर्क क्रमांक : ९४०५३३२१९.

**∗ श्वेता किरण जोशी :** (देशस्थ ऋग्वेदी), वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : १६ ऑगस्ट १९९२, जन्म वेळ : दुपारी ०१.३०, उंची : ५.३, सुदृढ बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : श्रीवत्स, रास : मीन, नक्षत्र : पूर्वा भाद्रपदा, चरण : चतुर्थ, नाडी : आद्य, गण : मनुष्य, शिक्षण : मास्टर इन क्लिनिकल न्युट्रीशन ॲण्ड् डायबेटीक्स् (नोंदणीकृत डाएटीशियन), नोकरी / व्यवसाय : चिफ डाएटीशियन - खाजगी रुग्णालय कल्याण, उत्पन्न : वार्षिक रु. ३.६ लाख, अपेक्षा : उच्च शिक्षित, निर्व्यसनी, शाकाहारी, कलेची आवड असावी, संपर्क क्रमांक : ९८१९१०४६७० / ९८२०९२८११०.

**∗ दिप्ती शशिकांत देशमुख :** (देशस्थ शुक्ल यजुर्वेदी), वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : २२ ऑगस्ट १९९६, जन्म वेळ : रात्री १०.५७, उंची : ४.११, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : सैंधवादन, रास : वृषभ, नक्षत्र : रोहिणी, चरण : चतुर्थ, नाडी : अंत्य, गण : मनुष्य, शिक्षण : बी.कॉम, नोकरी / व्यवसाय : नोकरीच्या शोधात आहे, अपेक्षा : अनुरुप, समकक्ष, संपर्क क्रमांक : ९८६९६५२४६६ / ९००४६९२३६५.

**घटस्फोटीत**

*** प्राजक्ता संदीप भट :** (चित्पावन), वास्तव्य : ठाणे, जन्म तारीख : १४ सप्टेंबर १९९३, जन्म वेळ : ०८.३०, उंची : ५.४, सुदृढ बांधा, जन्म ठिकाण : ठाणे, गोत्र : चंद्रायत, रास : कन्या, नक्षत्र : हस्त, चरण : तृतीय, नाडी : आद्य, शिक्षण : बी.कॉम (मॅनेजमेंट स्टडीज), नोकरी / व्यवसाय : ब्युटीपार्लर, उत्पन्न : वार्षिक १.५० लाख, अपेक्षा : मनमिळावू, स्वतःचे घर असावे, उंची ५.६ च्या वर असावी, संपर्क क्रमांक : ९०८२६२५७०.

*** सायली संजय साठे :** (चित्पावन), वास्तव्य : डोंबिवली, जन्म तारीख : १५ फेब्रुवारी १९९४, जन्म वेळ : सकाळी ०९.००, उंची : ५.८, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : डोंबिवली, गोत्र : शांडिल्य, शिक्षण : एम टेक इन बायो टेक्नोलॉजी, नोकरी / व्यवसाय : खाजगी, ठाणे, उत्पन्न : वार्षिक ६ लाख, अपेक्षा : सुस्थापित, उंच, स्वतःचे घर असावे, संपर्क क्रमांक : ९८२०५०४२१३ / ९८३३५८६७४५.

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील)**

## देणगी

श्री. अमित खेडकर, पुणे यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळास शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी रु. २५,०००/- ची देणगी दि. ०८.०८.२०२४ रोजी दिली आहे. मध्यवर्ती मंडळ करीत असलेल्या शैक्षणिक कार्याबद्दल श्री. खेडकर यांनी आनंद व्यक्त केला आणि समाजाचे आपण देणे लागतो. गरीब विद्यार्थ्यांसाठी संस्थेने देणगीच्या द्वारे मदत करावी अशी अपेक्षा व्यक्त करून मध्यवर्ती संस्था करीत असलेल्या कार्याचा गौरव केला.


**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास रोड, माहिम, मुंबई ४०००१६

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे आजीवन सभासद व्हा.

समाजकार्यात आपला सहभाग नोंदवा.

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर – माहीम विभागातील तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू–वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य–तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

**WITH**

**BEST**

**COMPLIMENTS**

**FROM**

## Ravindra Deshpande

# RASHMI
# ELECTRICAL & CONTRACTOR

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20% OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com


SAMARTH
URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.
मुख्य कार्यालय: समर्थ सदन, 1513, गुरुकृपा कॉम्प्लेक्स, पहिला मजला, मारूती गल्ली, बेळगाव. फोन: 2431357, 4202100
राणी चन्नम्मा नगर शाखा : भागिरथी, सी स्कीम, चन्नम्मानगर मेन रोड, बेळगाव. फोन : 2443161
टिळकवाडी शाखा : समर्थ लॅंडमार्क, मंगळवार पेठ (इंडियन बँकसमोर), टिळकवाडी, बेळगाव. फोन : 2430357
शहापूर शाखा : 1103, आर्केड क्लोअर, विठ्ठू गल्ली, शहापूर, बेळगाव. फोन : 2431257
खानापूर शाखा : 1524/A6, मणेरिकर बिल्डींग, बेळगांव-गोवा रोड, फोन : 6363090655
कोर बँकिंग प्रणाली वापरणारी एकमेव पतसंस्था
ग्राहकांचा विश्वास वृध्दींगत करणारी विश्वसनीय संस्था
सर्व गणेश भक्तांना
गणेश चतुर्थीच्या
हार्दिक शुभेच्छा!
चेअरमन
व्हा. चेअरमन
संचालक मंडळ
ॲड. अजय ए. सुनाळकर
अभय व्ही. जोशी
गणपत ए. कुलकर्णी
विनायक जी. जोशी
प्रदीपकुमार जी. कुलकर्णी
अरविंद एस. कुलकर्णी
मालतेश जी. पाटील
सुनंदा सी. आळतेकर
छाया एन. जोशी
अनिल व्ही. भंडारी
उमेश सुणगार
परशुराम एम. कांबळे
अशोक एच. पुजेरी
राघवेंद्र एस. केसनूर
सेक्रेटरी
गौरी एस. बिडी
जन. मॅनेजर

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## मध्यवर्ती संस्थेत स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजवंदन



Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH